# प्रतिसाद आणि प्रतिबंध

## लढण्यात आपले लष्कर कोणालाही हार जाणार नाहीच. परंतु गस्त आणि पहाऱ्याच्या आघाडीवर आपले नाणे पुरेसे खणखणीत नाही हे वास्तव आहे...

**पूर्व लडाखच्या** गलवाण नदी परिसरात चीनकडून मोठ्या प्रमाणात घुसखोरी झाल्याची कथित कबुली संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी दिल्याची बातमी येताच, तसे काही ते म्हणालेच नसल्याचा खुलासाही झाला. पण त्याहीपेक्षा मोठी बातमी कोणती? तर गेले काही दिवस या टापूत सुरू असलेल्या झटापटींबाबत चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी (तुलनेने भारतस्नेही अशी यांची प्रतिमा) रविवारी पत्रकार परिषदेत काही बोलतील अशी अपेक्षा होती; पण ते काहीच बोलले नाहीत, ही! याचा अर्थ चीन या कथित घुसखोरीला उल्लेखण्याइतपतही महत्त्व देत नाही नि आपल्याकडे मात्र चीनच्या ताठर साहसवादाविषयी चर्चा सुरू आहे. पूर्व लडाखमधील या भागात चीनने भारतीय हद्दीत केलेल्या घुसखोरीविषयी आता लेफ्टनंट जनरल या उच्च हुद्द्याच्या पातळीवरून चर्चा होईल ही बाब परिस्थिती नकळत पण पुरेशी चिघळल्याचे निदर्शक आहे. म्हणजे भारत व चीन यांच्यात नित्याप्रमाणे सीमांवरील ठाणेप्रमुखांची चर्चा होऊन हा प्रश्न सुटू शकत नाही हेही पुरेसे स्पष्टच आहे. त्यातही विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, प्रत्यक्ष ताबारेषा किंवा लाइन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल (एलएसी) वरील ज्या २३ भूभागांना 'विवाद्य म्हणून विचाराधीन' अशी मान्यता दोन्ही बाजूंकडून मिळालेली आहे, त्यापेक्षा पूर्णपणे वेगळ्या परिसरात चीनची कांगावखोर घुसखोरी सुरू झालेली आहे. तेथून चिन्यांना बाहेर काढायचे, तर चर्चा किंवा रेटा हे दोनच पर्याय आहेत. तूर्त पहिल्या पर्यायाचा मार्ग वापरला जात आहे. त्यासंबंधीची चर्चा शनिवार, ६ जून रोजी सुरू होत आहे. परंतु कधीही न आखल्या गेलेल्या, तरीही प्रत्यक्ष ताबारेषा म्हणवल्या जाणाऱ्या विशाल टापूतील गलवाण आणि हॉट स्प्रिंग्ज या दोन भूभागांमध्ये घुसलेले चिनी सैन्य 'प्रत्यक्ष ताबा' सहजपणे सोडण्याची चिन्हे नाहीत. तसे झाल्यास चीनची जमवाजमव अंदाजिण्यात आणि त्यांचा हेतू जोखण्यात आपण गाफील राहिलो का, असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. त्याची दखल घेणे भाग पडते.

सुमारे महिन्यापूर्वी, ५ मे रोजी चीनने पँगाँग सरोवर भागात गरजेपेक्षा अधिक सैनिक आणून ठेवले. याशिवाय सिक्कीमजवळ नाकू ला या ठिकाणीही चिनी सैनिकांची संख्या अचानक वाढली. सहसा निर्मनुष्य मानल्या जाणाऱ्या टापूतील त्यांची वाढती वर्दळ भारताच्या नजरेतून सुटण्यासारखी नव्हतीच. चीनचे हे कृत्य वरकरणी बुचकळ्यात टाकणारे होते. कारण कोविड-१९ महासाथीचा उगम चीनमध्ये झाला, त्यातून झालेल्या वित्तहानी व मनुष्यहानीतून तो देश त्या काळात नुकताच बाहेर पडू लागलेला होता. याउलट करोना विषाणूविरोधात भारताची लढाई त्या वेळी कुठे सुरू झाली होती. चीनच्या या कृत्यामागील उलगडा होण्यासाठी आणखी एका ५ तारखेचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. ती तारीख आहे ५ ऑगस्ट २०१९. त्या दिवशी भारत सरकारकडून जम्मू-काश्मीर राज्याचा विशेष दर्जा काढला गेला आणि जम्मू-काश्मीर व लडाख हे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश बनले. या कृतीमुळे पाकिस्तानला आणि काश्मीर खोऱ्यातील विभाजनवाद्यांना धडा शिकवल्याचा डिंडिम पिटला गेला असला तरी त्या राज्याचे भूराजकीय महत्त्व भारत आणि पाकिस्तानइतकेच चीनच्याही दृष्टीनेही आहे. या निर्णयावर लोकसभेत शिक्कामोर्तब करताना गृहमंत्री अमित शहा यांनी पाकव्याप्त काश्मीर आणि गिलगिट बाल्टिस्तानबरोबरच अक्साई चीनचाही उल्लेख केला होता. हे भूभाग परत मिळवण्यासाठी प्राणांची बाजी लावू हे त्यांचे भाषण. ते चीननेही गांभीर्याने घेतल्याची शक्यता दाट. कारण त्यानंतर काही महिन्यांतच चीनकडून तीन-चार भागांमध्ये घुसखोरी सुरू झाली. नाकू ला आणि पँगाँग सरोवर येथील झटापटींविषयी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांना विचारले गेले, त्या वेळी त्यात असाधारण असे काहीच नसल्याचे ते म्हणाले होते. ते बरोबरच होते. कारण या दोन्ही देशांदरम्यान सीमेवर बंदुकीतून शेवटची गोळी १९६७ मध्ये सुटली. यानंतर वाद झाले तरी परस्परांवर बंदुका चालवायच्या नाहीत असा करारच दोघांमध्ये झाला होता. मात्र झटापटींचा फार बागुलबोवा नको म्हणणारे जनरल नरवणे, त्या विधानानंतर काही आठवड्याभरातच लेह येथील लष्कराच्या १४व्या कोअरच्या मुख्यालयात तातडीने गेले. ते कशासाठी? यातूनच चीनचा वावर म्हणजे 'शतपावली' नव्हे, हे सिद्ध झाले. चीनने निवडलेली ठिकाणे अनेक आहेत. उदा. गलवाण खोरे, हॉट स्प्रिंग्ज, पँगाँग सरोवर ते नाकू ला... काही ठिकाणी प्रत्यक्ष ताबारेषेपासून जवळपास तीन-चार किलोमीटर आत घुसून चिनी सैनिकांनी भारतीय चौक्या, साकव उद्ध्वस्त केले आहेत. स्वतःचे तंबूही उभारले आहेत. काही बातम्यांमध्ये चिनी सैनिक शेकड्यांत नव्हे, तर हजारांत असल्याचाही उल्लेख आहे. शिवाय गलवाण खोऱ्याच्या पश्चिमेकडील भागावर चीनने यापूर्वी कधीही दावा सांगितला नव्हता, तो ते आता सांगू लागले आहेत. चिनी हालचालींमागील एक कारण असे सांगितले जाते, की गेली काही वर्षे या संपूर्ण टापूत भारताने रस्ते आणि पूलबांधणी केली. सैन्याची चटकन हालचाल करता यावी यासाठी असे बांधकाम भारताने उभारले. उदा. जगातील सर्वाधिक उंचीवर असलेली दौलत बेग ओल्डी भागातली धावपट्टी. डोकलाम भागात भूतानसाठी रस्ते बांधणाऱ्या भारतीय सैन्याने तेथील चिनी सैन्याच्या आक्षेपांना आणि धक्काबुक्कीला कित्येक आठवडे भीक घातली नव्हती. अखेरीस चीनलाच नमते घ्यावे लागले होते.

**चिनी हालचालींमागील एक कारण असे सांगितले जाते की, गेली काही वर्षे या संपूर्ण टापूत भारताने रस्ते आणि पूलबांधणी केली. दौलत बेग ओल्डी येथे धावपट्टीही उभारली. शिवाय, डोकलाममधून आपण चीनला मागे हटविले. यानंतरही चीनची जमवाजमव रोखण्यात आपण गाफील राहिलो का?**

असे असले, तरी चीनची घुसखोरी अशा प्रकारे उघडकीस येणे ही आपल्यासाठी नामुष्कीची बाब समजावी काय? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी जरा मागे जावे लागेल. लढण्यात आपले लष्कर कोणालाही हार जाणार नाही. परंतु गस्त आणि पहाऱ्याच्या आघाडीवर आपले नाणे पुरेसे खणखणीत नाही हे वास्तव आहे. कारगिल युद्ध भारताने जिंकले खरे, पण त्या वेळी आपल्याच हद्दीत पाकिस्तानकडून झालेली जमवाजमव आपल्या लक्षात आली नव्हती हेही वास्तव आहे.

अहमदाबादमध्ये साबरमती नदीच्या किनाऱ्यावर शांतपणे झोके घेणारे चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांची प्रत्यक्षात महत्त्वाकांक्षा आसुरी आहे. याचेच प्रतिबिंब हल्ली चिनी मुत्सद्दी आणि परराष्ट्र खात्यामध्येही पडलेले दिसते. 'वूल्फ वॉरियर' ही एका बटबटीत चित्रपटातील चरित्रनायकावर आधारित उपाधी चिनी मुत्सद्दी, नेते स्वतःलाच लावून घेताना दिसतात. उन्मादी वर्चस्वनशा हे वूल्फ वॉरियरचे भाववैशिष्ट्य. हाँगकाँगची गळचेपी, अमेरिकेविरुद्ध आक्रमक वाक् युद्ध आणि व्यापारयुद्ध, दक्षिण चीन समुद्रातील दंडेली ही लक्षणे चीनच्या वाढत्या वर्चस्वनशेची साक्ष पटवतात. भारताबरोबर वुहान-अहमदाबाद आणि दिल्ली-बीजिंग, महाबळीपुरम येथे पाहुणचार देणारे-घेणारे चिनी मुत्सद्दी वा राष्ट्रप्रमुख आणि हिमालयाच्या पाठीवर हळूहळू भारतीय भूभाग गिळंकृत करत चाललेले चिनी सैनिक हे वेगळे नाहीत, हे भारताने नीट ओळखायला हवे. चीन भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार असला, तरी भारतावर वर्चस्व गाजवण्याची आणि पाकिस्तानच्या मदतीने भारताची कोंडी करण्याची मनीषा चीनने सोडून दिल्याचे कोणतेही पुरावे नाहीत.

सध्याच्या परिस्थितीत बहुतेक प्रमुख देशांप्रमाणेच कोविड निराकरणात भारतही गुंतलेला आहे. तुलनेने चीन कोविडमुक्त झालेला दिसतो. चीनच्या साहसवादासाठी याहून चांगली संधी मिळण्यासारखी नाही, हे चीनच्याही आधी आपण ओळखायला हवे होते. प्रतिबंधात्मकतेत कमी पडल्यावर प्रतिसादाचे कौतुक कदाचित मूळ अपयश झाकण्यासाठी अधिकच उच्चारवात केले जाते हे उरी, पुलवामा घडल्यानंतरही आढळून आले आहे. आताही आपला प्रतिसाद उत्तम असेल. पण प्रतिबंधाचे महत्त्व आपण कधी ओळखणार हा प्रश्न उरतोच.




# महासत्ता की महासमता?

**२०२० सालातील दर महिन्याच्या अखेरच्या रविवारी त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि जाणकार मंडळी 'महासत्ता होता होता...' आपली वाटचाल आज कुठे आहे, याविषयी 'लोकसत्ता'च्या वाचकांसाठी आत्मपरीक्षणाची सुरुवात करून देतात. अप्रिय प्रश्न विचारतात आणि उत्तरांची दिशाही दाखवतात... जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून त्या सदरातील हा खास लेख- भारताने महासत्तेपेक्षा महासमतेच्या दिशेने मार्गक्रमणा करणे का गरजेचे आहे, हे सांगणारा... लेखक आहेत, पर्यावरण-अभ्यासक डॉ. गुरुदास नूलकर**

**संपत्ती, लष्करी** बळ किंवा राजकीय श्रेष्ठत्व अशा कोणत्याही मानवनिर्मित संकल्पनेला न जुमानता एका सूक्ष्म विषाणूने सर्व राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेला वेठीस धरले आहे. विकसित, श्रीमंत, तंत्रज्ञानात अग्रगण्य, व्यापारात श्रेष्ठ अशा पदव्या विसरून प्रत्येक देश जागतिक मंदीला तोंड देण्याच्या तयारीत आहे. कालपर्यंत स्वतःला महासत्ता म्हणवणारे देश विषाणूसमोर आज एखाद्या टीचभर राष्ट्राइतकेच हतबल झाले आहेत.

करोना महामारीला 'ब्लॅक स्वॉन इव्हेण्ट' म्हणजे अनपेक्षित आणि परिणामकारक घटना, असे म्हटले जात आहे. पण पृथ्वीच्या साडेचार अब्ज वर्षांच्या आयुष्यात अशा अनेक नैसर्गिक घटना होऊन गेल्या आहेत. खुद्द होमो सेपियन्सच्या इतिहासातही कित्येक मोठी संकटे येऊन गेली आहेत. त्यामुळे यापुढेही असे होत राहीलच, हे इतिहास आपल्याला सांगतो. पण या वेळेस मात्र जगभरात भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण जीवितहानीनंतर सर्वाधिक धोका अर्थव्यवस्था आणि जागतिक व्यापाराला आहे, ज्यावर संपूर्ण जग विसंबून आहे. अन्नपुरवठा आणि जीवनावश्यक वस्तूंसाठी बलाढ्य राष्ट्रेही इतरांवर अवलंबून आहेत. जागतिक अर्थव्यवस्था जशी क्लिष्ट आणि अधिक परस्परावलंबी होत जाईल, तसे अशा घटनांचे परिणाम अधिक तीव्रपणे जाणवतील. आज या आपत्तीने सर्वांना समान पातळीवर आणून ठेवले आहे आणि 'महासत्ता' या शब्दाला काही अर्थच राहिलेला नाही.

### महासत्तेची दोन अस्त्रे

महासत्ता होण्याच्या रणनीतीत प्रामुख्याने दोन अस्त्रांचा वापर होतो : भक्कम अर्थव्यवस्था आणि तगडे लष्कर! आर्थिक वृद्धीची सर्वोच्च पातळी गाठणे आणि जागतिक व्यापारावर आपली पकड ठेवणे, हे महासत्ताधीशाचे एक लक्षण आहे. त्यामुळे या स्पर्धेत देशाची प्रगती 'अविरत आर्थिक वाढ' या तत्त्वावर चालते, आणि जीडीपीच्या निकषावर चढाओढ सुरू असते. अर्थव्यवस्थेच्या प्रचलित प्रारूपात निसर्गाच्या स्वास्थ्याचा विचार न करता चलनी वाढ पोसली जाते. औद्योगिकीकरण आणि बाजारमागणी जशी वाढत जाते, तसा संसाधनांचा साठा घटत जातो आणि प्रदूषण तीव्र होत जाते. आज जागतिक उत्पादनवाढीचा दर आणि प्रमाण इतके वाढले आहे, की पृथ्वीवरील नैसर्गिक परिसंस्था निकृष्ट होत चालल्या आहेत आणि त्यांची जैविक उत्पादकता घटत आहे. प्रदूषित नद्या, समुद्राचे आम्लीकरण, घटते वन क्षेत्र आणि जैवविविधता, पोत गमावलेली माती यांतून निसर्गाचे स्वास्थ्य बिघडल्याचे जाणवते. अनियंत्रित कार्बन उत्सर्जनामुळे जागतिक तापमानवाढीचा भस्मासुर जन्माला आला आणि त्याचे पडसाद प्रत्येक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर उमटत आहेत. आज नैसर्गिक आपत्तींची वारंवारता वाढली आहे - कधी फनी तर कधी अम्फान, लदाखमध्ये अतिवृष्टी तर मराठवाड्यात दुष्काळ, शेतांवर अकल्पनीय स्वरूपाच्या टोळधाडी... अशा रौद्र रूपातून निसर्गाचा आघात अर्थव्यवस्थेवर होत आहे. आपत्तींचा सामना करण्यात पैसा खर्च होतो आणि निसर्गऱ्हासामुळे अर्थव्यवस्था दुर्बल होत जाते. आर्थिक वृद्धीच्या धुंदीत हे लक्षात येत नाही, कारण जीडीपीच्या हिशेबात नैसर्गिक भांडवलाची घट धरली जात नाही, फक्त चलनी पैसा मोजला जातो. महासत्तांमध्ये रंगलेल्या 'ग्रोथ ॲट ऑल कॉस्ट'च्या स्पर्धेत प्रत्येक देशाचे कार्बन उत्सर्जन सतत वाढत चालले आहे. २०१८ साली भारताकडून १३.२ कोटी टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन झाले, ज्याचे परिणाम तापमानवाढीतून दिसतात.





### स्पर्धेचा फायदा नक्की कोणाला?

लष्करी बळ हे महासत्तेच्या रणनीतीचे दुसरे अस्त्र. औद्योगिक क्रांतीपासून आजपर्यंत अधिकाधिक नैसर्गिक संसाधने युद्धसामग्रीच्या उत्पादनात वापरली जात आहेत. आण्विक, रासायनिक आणि जैविक अस्त्रे जगभरात विकसित होत आहेत. ड्रोन, जीपीएस आणि अद्ययावत संगणकांच्या वापराने कोणत्याही ठिकाणावर अचूक हल्ला करण्याची क्षमता सत्ताधीशांकडे आहे. आज महायुद्ध झाले तर फक्त मानवजात नव्हे, तर सजीवसृष्टी नेस्तनाबूत होण्याचा धोका आहे. सीमा प्रश्न आणि दहशतवादाच्या चिंतेने प्रत्येक देश युद्धसामग्री आणि फौजेवर खर्च वाढवत चालला आहे. 'डिफेन्स टेक्नॉलॉजीज्'च्या फायदेशीर क्षेत्रात बलाढ्य जागतिक कंपन्या कार्यरत आहेत आणि जागतिक व्यापारावर त्यांचा मोठा प्रभाव आहे. विकसित देशांच्या जीडीपीमध्ये या व्यवसायाचा मोठा हातभार असल्याने स्वतःच्या देशातील राजकारणात युद्धलाभार्थींचे वजन आहे. त्यांचे मुख्य ग्राहक दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि आशिया खंडातील गरीब आणि विकसनशील देश तर आहेतच, पण आयसिस आणि अल-कायदासारख्या दहशतवादी संघटनाही आहेत. दहशतवादापासून बचाव करणारी साधने हीच दहशतवादाला कारणीभूत आहेत, या गोष्टीला न जुमानता उत्पादनात वाढ होत चालली आहे. २०१९ साली भारताने सुरक्षेवर २१.१ अब्ज डॉलर खर्च केला. त्या वर्षीच्या सरकारी खर्चात याचा सुमारे नऊ टक्के वाटा आहे. इतकी मोठी रक्कम सुरक्षेसाठी गेल्यामुळे इतर विकासकामांच्या तरतुदींवर गदा येते. जागतिक अशांततेचा आर्थिक फायदा महासत्तेच्या रिंगणात असलेले अमेरिका, चीन, इंग्लंड, जपान, कोरिया अशा श्रीमंत राष्ट्रांनाच होतो, आणि शस्त्रास्त्रांवर खर्च वाढल्यामुळे गरीब देशांच्या सामाजिक विकासात पैसा अपुरा पडतो.

महासत्तेच्या स्पर्धेत फायदा नक्की कोणाचा होतो, याचा विचार कधी केला जात नाही. त्या पदावर जे आहेत त्यांना निश्चितच फायदा होऊन स्वतःची अर्थव्यवस्था अधिक बळकट करण्याची संधी प्राप्त होते. विकसित राष्ट्रांनी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना या संस्थांचा वापर अनेकदा स्वतःच्या फायद्यासाठी करून घेतला आहे. एका राष्ट्राला महासत्तेचा मुकुट धारण करता यावा यासाठी संपूर्ण जगाला पर्यावरणीय ऱ्हास आणि अशांततेची किंमत मोजावी लागते. या स्पर्धेत आपण समाजाला कोठे नेऊन ठेवले आहे ते आरोग्य सेवा, वकिली, संरक्षण तंत्रज्ञान, सुरक्षा सेवा या क्षेत्रांतील वाढीतून स्पष्ट दिसते. प्रत्येक देशात आर्थिक वृद्धी श्रीमंतांच्या पथ्यावर पडते आणि गरजू मात्र विकासातून वंचित राहतात, असे चित्र दिसते.

### सामूहिक ध्येये हवीत...

मग जागतिक कारभाराला शाश्वत दिशा दाखवायला कोणते कार्यतंत्र योग्य राहील? संयुक्त राष्ट्रे ही संस्था त्यासाठी खरे तर योग्य आहे. आजपर्यंत संयुक्त राष्ट्रांनी अनेक चांगले उपक्रम राबविले आहेत, त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल शंका नाही. पण त्यांच्या कार्यपद्धतीत अनेक वैगुण्ये आहेत, सदस्यांत मतभेद आहेत आणि कामकाजावर काही थोड्या प्रगत राष्ट्रांची पकड आहे- विशेषतः सुरक्षा परिषदेवर. पूर्णपणे लोकशाही तत्त्वांवर ही संघटना चालवली आणि प्रत्येक राष्ट्राला समान अधिकार दिले, तर तिचे कार्य अधिक परिणामकारक होईल. 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स'अंतर्गत सदस्य राष्ट्रांनी सामाजिक विषमता आणि जागतिक हवामान बदलाचा सामना एकत्रितपणे करणे अपेक्षित आहे. पण आज हे ऐच्छिक आहे. ते बंधनकारक करून सामूहिक जागतिक पर्यावरणीय ध्येय आणि उद्दिष्टे (शेअर्ड इकॉलॉजिकल व्हिजन) ठरवायला हवीत. आज हे नसल्यामुळे पर्यावरण आणि विकास या परस्परविरोधी संज्ञा झाल्या आहेत आणि त्यावर देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय वाद चालू आहेत. भारताला हिमालयात नवीन धरणे बांधून वीजनिर्मिती करायची आहे, तर भूतानला हिमालयाची वनसृष्टी टिकवायची आहे. चीनच्या उद्योगजगतात 'रेअर अर्थ' खनिजांची मागणी वाढत चालली आहे, पण पर्यावरणीय हानी होत असल्याने मंगोलिया आणि सायबेरिया नवीन उत्खननाची परवानगी देत नाहीत. जपानला मासेमारीचा व्यवसाय वाढवायचा आहे, पण युरोपीय देशांकडून त्यांना विरोध होत आहे. आज स्वीकृत सामूहिक पर्यावरणीय ध्येय नसल्यामुळे हा विरोधाभास वाढत चालला आहे. हे काम संयुक्त राष्ट्रांना शक्य आहे. त्याचबरोबर आज आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय न्यायव्यवस्थेची गरज आहे. 'ग्लोबल पब्लिक गुड्स' म्हणजे पृथ्वीचे वातावरण, महासागर, शुद्ध पाणी, हवा अशी जागतिक सार्वजनिक संसाधने कोणा एका देशाच्या मालकीची नाहीत; पण त्यांची निगा राखण्याची जबाबदारी मात्र प्रत्येक देशाची आहे. या गोष्टीचे पालन न करणे, हवामान बदलाचे करार मोडणे, जागतिक स्वरूपाचे पर्यावरणीय गुन्हे अशा गोष्टींसाठी वेगळी न्यायव्यवस्था केली तरच पर्यावरणाच्या सामूहिक ध्येयांचा पाठपुरावा करणे शक्य होईल.

### भारताची भूमिका

या प्रवासात भारताला महत्त्वाची भूमिका घेण्याची संधी आहे. पृथ्वीवरील १८ टक्के लोकसंख्या असलेला भारत, गेली ७३ वर्षे यशस्वीरीत्या लोकशाहीच्या मार्गाने प्रशासित आहे. चीन आणि इतर विकसित देशांपेक्षा भारताची स्पर्धात्मक वृत्ती सौम्य आहे. भारतीय संस्कृती शांतताप्रिय आहे आणि इतरांशी जुळवून घेण्याकडे अधिक कल आहे. आजही ग्रामीण भागातून आणि आदिवासी समाजातून संसाधनांचा काटकसरीने वापर केला जातो आणि निसर्गाला देवाचे स्थान देऊन जोपासले जाते. रोजच्या वस्तूंचा पुनर्वापर आणि पुनरुज्जीवन करणे अशा गोष्टी शहरी जीवनातही प्रचलित आहेत. आपल्या पर्यावरणीय भाराची सर्वाधिक जाणीव भारतीय ग्राहकांना आहे, असे 'नॅशनल जिओग्राफिक'च्या 'ग्रीनडेक्स' अभ्यासातून दिसून येते. उष्णकटिबंध हवामानाच्या प्रदेशात वसलेल्या भारताची जैवविविधता आणि निसर्गसंपत्ती आजही अग्रगण्य आहे. धर्म, संस्कृती व भाषेचे प्रचंड वैविध्य जपून लोकशाहीच्या मार्गाने प्रशासन करणाऱ्या देशाने खरे तर जगासमोर आदर्श ठेवला पाहिजे. पण दुर्दैवाने स्वातंत्र्यापासून आजपर्यंत आपण पाश्चात्त्य अर्थव्यवस्था आणि जीवनशैलीचे अनुकरण करीत आलो आहोत. भारताची परंपरा आणि संस्कृती जोपासणारे प्रशासन म्हणजे 'हिंदस्वराज' हे गांधीजींचे स्वप्न होते. सुबत्ता आणि समृद्धीचा पाठपुरावा करण्यासाठी, गांधीजी म्हणत- समता, अहिंसा आणि शाश्वत जीवनशैलीचा पुरस्कार केला पाहिजे. आज काही विकसित देशांना हा मार्ग पटला आहे.

परंतु आज तीव्र स्पर्धेच्या वातावरणात सामान्य भारतीय नागरिकांची जीवनशैली बदलून गेली आहे. देशातून दरडोई कार्बन उत्सर्जन आणि संसाधनांचा वापर विकसित राष्ट्रांपेक्षा खूपच कमी असला, तरीही लोकसंख्येमुळे आपले पर्यावरणीय पदचिन्ह (फूटप्रिन्ट्स) अजस्र होत चालले आहे. औद्योगिक विकास आणि शहरीकरणाच्या रेट्यात वन क्षेत्र, वन्यजीव आणि नैसर्गिक संसाधने धोक्यात आली आहेत. आजच्या पिढीची मागणी पुरवण्यासाठी आपण येणाऱ्या पिढ्यांचा साठा वापरत चाललो आहोत. निसर्गात दीर्घकाळ सक्रिय राहू शकणारे नवनवीन प्रकारचे प्रदूषण भविष्यात धोकादायक ठरू शकेल. देशातील एकूण गरिबी घटत असली, तरी आनुवंशिक गरिबीच्या लोकसंख्येत वाढ आहे.

सर्व राष्ट्रांचे अस्तित्व एका पृथ्वीच्या चयापचयामुळे टिकून आहे. पर्यावरणीय प्रश्न सर्व राष्ट्रांना एकसारखा भेडसावत असला, तरी प्रत्येकाला त्याची तीव्रता सारखी जाणवत नाही. याचे एक कारण म्हणजे राष्ट्रांमधील आर्थिक आणि भौतिक विषमता. स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेमुळे नैसर्गिक संसाधनांच्या वाटपात असमतोल निर्माण झाला आहे आणि त्याचा विपरीत परिणाम जागतिक अशांततेतून दिसत आहे. प्रत्येक राष्ट्राचा स्वाभिमान आज उत्कट होत असला, तरी पर्यावरण रक्षणाच्या सामूहिक जबाबदारीची जाणीव मात्र अंधूक झाली आहे. हे चक्र उलट फिरण्यासाठी 'महासत्ता' बनण्याची चढाओढ 'महासमते'कडे वळवून अर्थव्यवस्थेची स्पर्धा निसर्ग संवर्धनात बदलली पाहिजे. तरच आपले 'होमो सेपियन्स' हे नाव सार्थक होईल!

**लेखक पर्यावरणीय व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या विषयांचे अभ्यासक असून पुणे येथील सिम्बायोसिस संस्थेत प्राध्यापक आणि 'इकॉलॉजिकल सोसायटी, पुणे'चे विश्वस्त आहेत. gurudasn@gmail.com**

अन्वयार्थ

# मध्यमवर्गाचा भाव-इतिहासकार!

**गीतकार योगेश** यांचे निधन झाल्याचे वाचून 'रजनीगंधा' चित्रपटाची गाणी लिहिणारा कवी गेल्याची हळहळ अनेकांना वाटत असतानाच बासु चटर्जी यांचे जाणे अधिक चटका लावणारे आहे. करोनाकाळात टाळेबंदीमुळे का होईना, कुटुंबीय एकत्र आलेले असताना आणि दुकानाच्या रांगेत उभे राहणाऱ्या मध्यमवयीनांना १९८० पूर्वीचा काळ आठवत असताना बासुदा गेले. अंथरूण पाहून पाय पसरणाऱ्या, गरिबीला धट्टीकट्टी म्हणत तिची तुलना लुळ्यापांगळ्या श्रीमंतीशी करणाऱ्या आणि मुख्य म्हणजे प्रेमासारख्या सहज भावनेच्या अभिव्यक्तीप्रसंगी 'संस्कारां'मुळे बुजणाऱ्या मध्यमवर्गाला त्यांनी चित्रपटांत आणले व्यावसायिक यशसुद्धा मिळवले- तेही, 'अँग्री यंग मॅन' अमिताभचे चित्रपट जोरात असताना. अमोल पालेकरांनी हृषीकेश मुखर्जींच्या किंवा अन्य दिग्दर्शकांच्याही चित्रपटांत स्मरणीय भूमिका केल्या असल्या तरी, 'रजनीगंधा' आणि 'छोटीसी बात'मधून पालेकरांची एक अमीट प्रतिमा तयार केली ती बासुदांनीच. हे बासुदा असे की, 'शौकीन' किंवा 'पसंद अपनी अपनी'मध्ये मिथुन चक्रवर्ती याच्याकडूनसुद्धा सरळमार्गी मध्यमवर्गीय तरुणाची भूमिका त्यांनी उत्तमपणे वठवून घेतली आणि मिथुन म्हणजे कराटे, डिस्को ही समीकरणे तात्पुरती का होईना पण अडगळीत पडली. हे करण्यासाठी धमक लागते. ती बासुदांनी कुठून मिळवली असेल?



उत्तर सोपे आहे : साहित्यातून! जगण्यातले श्रेय शोधणारे काहीसे आदर्शवादी साहित्य १९४० च्या दशकात होते, तर त्यानंतरचा १९६० चा काळ हा जगणे जसे असते तसे टिपणाऱ्या साहित्याचा कालखंड होता. हिंदीत प्रेमचंदांपासून ते मन्नू भण्डारी, राजेन्द्र यादव, मोहन राकेश यांच्यापर्यंतच्या लेखकांमधून या कालखंडांतला फरक दिसतो; मराठीत खांडेकर, य. गो. जोशी यांच्यानंतर जयवंत दळवी, अरविंद गोखले यांच्या कथा-कादंबऱ्या हाच फरक दाखवतात; तर बंगालीत काळाचा हा फरक बिभूतिभूषण बंदोपाध्याय ते शंकर अशा लेखकांमधून दिसतो. 'जगण्याचा आरसा' समोर ठेवणारे हे साहित्य १९६० च्या दशकात आले, तेव्हा मध्यमवर्गीयांचा अनौपचारिक इतिहासच कथा-कादंबऱ्यांतून लिहिला जात होता. राष्ट्रकवी दिनकर यांनी राजेन्द्र यादव यांच्या 'सारा आकाश' या कादंबरीला दिलेली दाद नेमकी अशाच शब्दांतली आहे. 'कादंबरीकाराने निम्नमध्यमवर्गीयांच्या वेदनांचा इतिहास लिहिला आहे, जो आपल्यापैकी बहुतेकांनी भोगला असेल' असा दिनकर यांचा अभिप्राय. बासुदांनी गांभीर्याने चित्रपटकार म्हणून कारकीर्द सुरू केली ती याच 'सारा आकाश'वर चित्रपट काढून! बहिणीच्या लग्नात हुंडा द्यावा लागला, त्याचे कर्ज डोईजड झाले म्हणून आता धाकट्या भावाने लग्न करायचे- हुंडा घ्यायचा आणि आधीचे कर्ज फेडायचे... ही कथा बासुदांनी जिवंत केली. कादंबरी ते पटकथा या माध्यमांतरामध्ये काय घ्यायचे आणि काय सोडून द्यायचे याची पक्की समज या पहिल्याच कामात त्यांनी दाखवली होती. कदाचित, फणीश्वरनाथ रेणू लिखित 'मारे गए गुलफाम' या कादंबरीवर आधारलेला 'तीसरी कसम' हा चित्रपट दिग्दर्शित करणाऱ्या बासु भट्टाचार्य (हे सीनियर बासुदा!) यांचा सहायक दिग्दर्शक म्हणून काम करणे आपल्या ज्युनियर बासुदांनी आवडीने पत्करले होते, म्हणूनही असेल. पण साहित्याचा आधार चित्रपटांना हवा म्हणजे काय हवे- आणि काय नको हेसुद्धा- बासु चटर्जी यांनी ओळखले होते. चित्रपटांत केवळ शब्द नसतात... अभिनयातून साकार होणारी माणसे असतात! ही माणसे आणि त्यांचा भवताल, हे मध्यमवर्गीयांनी अगदी जगलेलाच अनुभव मांडताना कसे साकार करायचे, याचेही भान बासुदांना होते. त्यांच्या चित्रपटांमधील 'लोकेशन्स'मधून हे भान दिसे, पडद्यावरील कलावंतांच्या कपड्यांमधूनही दिसे.

हृषीकेश मुखर्जी, बासु भट्टाचार्य आणि बासु चटर्जी हे तिघेही बिमल राय यांच्या परंपरेतले. चित्रीकरण आणि खोटेपणा यांचे नाते तोडताना बासु चटर्जींनी 'दो बिघा जमीन' च्या पुढले पाऊल टाकले. 'सारा आकाश'चे अख्खे चित्रीकरण राजेन्द्र यादवांच्या राजा की मंडी (आग्रा) येथील घरातच करून बासु चटर्जींनी अभावितपणे 'हिंदी न्यू वेव्ह' चित्रपटांचा पाया मजबूत केला. पुढे 'रजनीगंधा'मध्ये विद्या सिन्हा आणि अमोल पालेकर यांच्या भेटीगाठी 'जहांगीर आर्ट गॅलरी'लगत त्या वेळी असलेल्या 'समोवार कॅफे'त बासुदांनी घडवल्या. आणखीही कित्येक चित्रपटांतून टॅक्सी, रिक्षा, डबलडेकर बसमधून ये-जा करणाऱ्या नायक-नायिकांच्या नजरेतून, त्या वाहनांतूनच त्यांना दिसणारी मुंबई दाखवली. ही दृश्ये अजिबात अलौकिक वगैरे नव्हेत, दिपवणारी तर नव्हेतच. इतकेच कशाला- तस्करीच्या अधोविश्वातील अंधाऱ्या गल्ल्या आणि बॉस लोकांचे अड्डे आदींतून धक्कादायक आणि 'कधीच पाहिले नाही- पाहण्याची हिंमतसुद्धा नाहीच' असे मुंबईचे रूप १९७२ ते ७५च्या काही चित्रपटांतून दिसायचे, तसेही काही बासुदांनी दाखवले नाही. त्यांनी दाखवलेली मुंबई 'आपली' वाटणारीच होती. सरळसाधी. नेहमीची. 'चितचोर'मध्ये प्रेक्षकांना त्यांनी गावाला नेले. 'शौकीन'मध्ये तर गोव्यालाही नेले. पण गावाला येऊन 'मै तो गया मारा' म्हणणारा 'चितचोर'चा नायक जसा मुंबईचा, तसे 'शौकीन'मधले चारही म्हातारेसुद्धा मूळचे मुंबईचेच. स्टुडिओ पद्धतीच्या अस्तानंतर, बड्या बॅनरांसोबत छोटे निर्मातेही स्थिरावत असताना आणि 'राजश्री प्रॉडक्शन्स'ला 'हम आपके है कौन'च्या उच्चमध्यमवर्गीय भपक्याने भुलवले नसताना, करण जोहर शाळकरी असताना जे अनेक दिग्दर्शक नामवंत झाले, त्यांपैकी बोरिवलीला भाड्याच्या घरात राहणारे बासु चटर्जी हे एक!

बासुदांवर एक आक्षेप हमखास घ्यावा असा. तो म्हणजे, संधी आणि बौद्धिक कुवत असूनसुद्धा त्यांनी चित्रपटांमध्ये राजकीय भाष्य आणले नाही. दिवंगत प्रिया तेंडुलकरांना 'रजनी'चे रूप देऊन गृहिणी व सजग नागरिक यांतला फरक बासुदांनी मिटवला, हे खरे. पण त्याहीपुढली- मनोहर श्याम जोशी लिखित 'कक्काजी कहीन' या भारतीय राजकारणाचे सत्यदर्शन घडवणाऱ्या व्यंग्यसंग्रहाला दूरदर्शन मालिकेचे रूप देण्याइतकी- कुवत जर बासुदांकडे होती; तर त्यांच्या पात्रांनी कधी राजकीय भूमिका का नाही घेतली? याचे उत्तर शोधण्यासाठी, त्यांच्या नायिकांकडे पुन्हा पाहावे लागेल... या नायिकांपैकी चटकन आठवणाऱ्या म्हणजे विद्या सिन्हा आणि झरीना वहाब किंवा दोन-तीन चित्रपटांत रती अग्निहोत्री. तिघीही चापूनचोपून वॉयलच्या साड्या नेसणाऱ्या. त्यातून प्रेक्षकांच्या वकुबानुसार घडेल तितकेच अंगप्रदर्शन. एरवी नाही. एक नीतू सिंगने साकारलेली 'प्रियतमा' वगळता या प्रेमिका-नायिकांच्या व्यक्तिमत्त्वांत अबोध लोभसपणा. पण अशा नायिकांच्या पलीकडे 'स्वामी'मधल्या गिरीश कर्नाड यांची नायिका म्हणून शबाना आझमींना स्थान देऊन बासुदांनी, साक्षात् शरच्चंद्र चट्टोपाध्यायांची कादंबरी 'स्त्रीवादी' केली. 'शौकीन'ने स्त्रियांचे वस्तुकरण हा निव्वळ पुरुषी अहंकाराचा भाग कसा, याचे बिंग फोडले. त्याहीनंतरचा (१९९४) 'त्रियाचरित्र' हा चित्रवाणीपट, पुरुषी अत्याचारामुळे लढाऊ होणाऱ्या स्त्रीची कहाणी सांगतो. स्त्री-पुरुष समानता तसेच मध्यमवर्गीय संस्कारांतून आलेली मूल्ये जपणे, हे बासु चटर्जी यांचे 'राजकारण'च (चांगल्या अर्थाने) होते! मध्यमवर्गीय भावभावनांच्या या 'इतिहासकारा'ला 'लोकसत्ता'तर्फे आदरांजली.

*'उलटा चष्मा' आणि 'व्यक्तिवेध' ही सदरे अपरिहार्य कारणांमुळे आजच्या अंकात नाहीत.*